Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

**विषय – शिवस्पंदन वार्षिक क्रिडा महोत्सवामध्ये घ्यावयाच्या काळजीबाबत.**

विद्यापीठातील सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक यांना कळविण्यात येते की, क्रीडा अधिविभागामार्फत दि. 04 मार्च, 2024 ते दि. 07 मार्च, 2024 या कालावधीत शैक्षणिक वर्ष 2023–24 मधील विद्यापीठ अधिविभागांमधील विद्यार्थी/विद्यार्थीनींचे वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे.

उपरोक्त स्पर्धा कालावधीमध्ये उन्हाचा पारा चढता असून, उष्णतेचे प्रमाण वाढत आहे. तसेच स्पर्धा कालावधीमध्ये सहभागी स्पर्धकांना उष्माघात होऊ नये यासाठी घ्यावयाची काळजी व झाल्यास त्यावर घ्यावयाचे उपचार याबाबत खालीलप्रमाणे आपल्या अधिविभागातील सर्व विद्यार्थी/विद्यार्थीनींना अवगत करावे.

**उष्माघाताची लक्षणे व वेळीच लक्षणे जाणून त्यावरील घ्यावयाचे उपचार.**

<u>लक्षणे</u> :– थकवा येणे, तहान लागणे, डोके दुखणे, अस्वस्थ वाटणे, जीभ कोरडी पडणे, रक्तदाब कमी होणे, हृदयाची धडधड होणे, चक्कर येऊन बेशुध्द पडणे.

<u>उपचार</u> :– प्रखर उन्हात जाणे टाळावे, पाण्याची बाटली सोबत ठेवावी, जास्त पाणी प्यावे, लिंबू पाणी अथवा ओआरएसचे पाणी थोडया थोडया वेळाने सतत घेत रहावे, सुती कपडयांचा वापर करावा, उन्हापासून संरक्षणासाठी सावलीमध्ये बसावे अथवा छत्रीचा वापर करावा, टोपीचा अथवा रूमालाचा वापर करावा.

कुलसचिव

जा.क्रं. आरोग्य केंद्र/98

दिनांक : 01 MAR 2024

प्रति,

१. मा. कुलगुरू, मा. प्र.कुलगुरू, मा.कुलसचिव, मा.संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ व मा. वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालयास.
२. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक.
३. संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण
४. इंटरनेट विभाग – सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

**सदरचे परिपत्रक आपल्या अधिविभागातील सर्व क्रिडा समन्वयक, विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या निदर्शनास आणावे.**

Scanned with OKEN Scanner